aglasem.com

FOR MAHARASHTRA BOARD (MSBSHSE) CLASS 9 EXAM PREPARATION

Maharashtra Board (MSBSHSE) Class 9 2026 Question Paper · Maths Paper 1 (Algebra)

EXAM
Maharashtra Board (MSBSHSE) Class 9

YEAR
2026

TYPE
Question Paper

SUBJECT
Maths Paper 1 (Algebra)

म. वि. प्र. समाज, नाशिक

द्वितीय सत्र परीक्षा

२०२५-२६

विषय – गणित भाग-I

माध्यम– मराठी

पेपर नं. ४२

इयत्ता: दहावी तुकडी:

हजेरी क्र.:

दिनांक:

वेळ : २.०० तास

एकूण गुण : ४०

पृष्ठ संख्या : ४

सूचना : 1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

2) गणक यंत्राचा (Calculator) वापर करण्यास मनाई आहे.

3) उजवीकडील अंक गुण दर्शवितत.

4) प्रत्येक बहुपर्यायी प्रश्नासाठी (प्रश्न 1 (A)) मुल्यमापन प्रथम प्रयत्नासच केले जाईल.

5) बहुपर्यायी प्रश्नाचे उत्तर लिहितांना उपप्रश्न क्रमांक लिहून त्यासमोर अचुक पर्यायाचे वर्णाक्षर (A, B, C, D) लिहावे.

प्र. 1 अ) पुढील प्रत्येक उपप्रश्नासाठी चार पर्यायी उत्तरे दिली आहेत त्यापैकी अचुक पर्याय निवडून त्याचे वर्णाक्षर लिहा. (4)

1) 1 मिलीमीटरचे 1 सेंटिमीटरशी असलेले गुणोत्तर पुढीलपैकी कोणते?

a) 1 : 100 b) 10 : 1 c) 1 : 10 d) 100 : 1

2) $3x + 5y = 9$ आणि $5x + 3y = 7$ तर $x + y$ ची किंमत पुढीलपैकी कोणती आहे.

a) 2 b) 16 c) 9 d) 7

3) विविध प्रकारच्या गुंतवणूकीपैकी 80c कलमांनुसार आयकर गणनेसाठी जास्तीत जास्त किती रूपये वजावट मिळते?

a) दीड लाख रूपये b) अडीच लाख रूपये c) एक लाख रूपये d) दोन लाख रूपये

4) (25 - 35 या वर्गाची वरची वर्गमर्यादा कोणती?)

a) 25 b) 35 c) 60 d) 30

ब) पुढील उपप्रश्न सोडवा. (4)

1) गणिताच्या गृहपाठांत 7 विद्यार्थ्यांना मिळालेले 100 पैकी गुण खालील प्रमाणे आहेत. 99, 100, 95, 100, 100, 80, 90 यावरून मिळालेल्या गुणांचे बहुलक काढा.

2) आपल्या देशातील वित्तीय वर्ष सुरू होण्याची व संपण्याची तारीख लिहा.

3) जर $m + 3 = 5$ तर m ची किंमत काढा.

4) पुढील शतमाने संक्षिप्त गुणोत्तरांच्या रूपात लिहा. 75 : 100

प्र. 2 अ) पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती पूर्ण करा. (4)

1) पुढील एकसामायिक समीकरण सोडवा.

i) $x + y = 4$; $2x - 5y = 1$

$x + y = 4$ ..... (1)

$2x - 5y = 1$ ..... (2)

समीकरण (1) ला 5 ने गुणू

$5x + \square = 20$ ..... (3)

समीकरण (2) व (3) ची बेरीज करू.

$5x + 5y = 20$ ..... (3)

$2x - 5y = 1$ ..... (2)

$\square = 21$

$\therefore x = \frac{21}{7}$ $\therefore x =$ ☐

$x = 3$ ही समीकरण (1) मध्ये भरू

$\therefore 3 + y = 4$

$\therefore y = 4 - 3$

$\therefore y =$ ☐

(3, 1) ही दिलेल्या समीकरणांची उकल आहे.

2) राधिकाचे मासिक उत्पन्न 10,000 असून ती त्यापैकी 60% रक्कम खर्च करते; तर ती दरमहा किती बचत करते ते काढण्यासाठी पुढील कृती करा.

रित : ₹10,000 चे 60% खर्च = ☐

बचत = ☐ − ☐ = ☐

∴ राधिकाची दरमहा बचत 4000 रू आहे.

3) दिलेली सारणी पूर्ण करा.

वर्ग (वय वर्षे)	ताळ्याच्या खुणा	वारंवारता (f) विद्यार्थी संख्या
20-21	𝍸	5
21-22	𝍸 𝍸 IIII	9
22-23	𝍸 II	7
23-24	𝍸	5
		N = ∑ f = 30

ब) खालीलपैकी कोणतेही चार उपप्रश्न सोडवा. **(8)**

1) एक लहान घर 3 माणसे 8 दिवसांत बांधू शकतात, तर तेच घर 6 दिवसांत बांधण्यास किती माणसे लागतील?

2) पुढील सारणीचे निरीक्षण करा. सारणीमध्ये दिलेल्या व्यक्तींना दिलेल्या करपात्र उत्पन्नावर आयकर भरावा लागेल किंवा नाही ते लिहा.

क्र.	व्यक्ती	वय	करपात्र उत्पन्न (₹)	आयकर भरावा लागेल किंवा नाही.
1.	कु. निकिता	27	₹ 2,34,000	
2.	श्री. कुलकर्णी	36	₹ 3,27,000	
3.	श्रीम. मेहता	44	₹ 5,82,000	
4.	श्री. बजाज	64	₹ 8,40,000	

3) आई व मुलगा यांच्या वयांची बेरीज 45 आहे. आईच्या वयाच्या दुपटीतून मुलाचे वय वजा केले तर वजाबाकी 54 येते, तर त्या दोघांची वये काढा.

4) 35 ते 40 या वर्गाचा वर्गमध्य काढा.

5) जर $\frac{a}{b} = \frac{2}{3}$ तर पुढील राशींच्या किंमती काढा. $\frac{a^3 + b^3}{b^3}$

प्र. 3 अ) पुढीलपैकी कोणतीही एक कृती पूर्ण करा. **(3)**

1) ☐ABCD समांतर भुज चौकोन आहे. त्याच्या $\angle A$ व $\angle B$ यांच्या मापांचे गुणोत्तर 5 : 4 आहे. तर $\angle B$ चे माप काढा.

रित : दिलेल्या गुणोत्तराची समानपट x मानू.

(2)

$\angle A = 5x^\circ$ and $\angle B =$ ☐

$\angle A$ व $\angle B$ यांच्या हे समांतरभुज चौकोनाचे लगतचे कोन आहे.

$\angle A + \angle B =$ ☐ (interior angles)

$\therefore$ ☐ $+ 4x^\circ = 180^\circ$

$\therefore 5x + 4x = 180^\circ$

$\therefore$ ☐ $= 180^\circ$

$\therefore x = \frac{180}{9}$

$\therefore x =$ ☐

$\angle B = 4x^\circ$

$= 4 \times 20$

$\therefore \angle B =$ ☐

The measure of $\angle B$ is 80°

2) खालील संचित वारंवारता सारणी पूर्ण करा.

वर्ग (उंची-सेमीमध्ये)	वारंवारता	पेक्षा कमी संचित वारंवारता
150 - 153	5	5
153 - 156	7	5 + 7 = 12
156 - 159	15	☐ + 15 = ☐
159 - 162	10	☐ + ☐ = 37
162 - 165	5	37 + 5 = 42
165 - 168	3	☐ + ☐ = 45
	एकूण N = 45	

ब) पुढीलपैकी कोणतेही दोन उपप्रश्न सोडवा. **(6)**

1) जर $\frac{x}{3x-y-z} = \frac{y}{3y-z-x} = \frac{z}{3z-x-y}$ आणि $x+y+z \neq 0$ तर प्रत्येक गुणोत्तराची किंमत 1 आहे असे दाखवा.

2) प्रियंका व दीपिका यांच्या वयांची बेरीज 34 वर्षे आहे. प्रियंका दीपिकापेक्षा 6 वर्षांनी मोठी आहे. तर त्यांची वये काढा.

3) मुकुंदचे 7 वर्षाचे सोयाबीनचे एकरी उत्पन्न क्विंटलमध्ये 10, 7, 5, 3, 9, 6, 9 असे आहे. यावरून सोयाबीनच्या एकरी उत्पन्नाचा मध्य, मध्यक व बहुलक काढा.

4) एका बचत खात्यामध्ये वर्षाच्या सुरूवातीला 24,000 रूपये होते. त्यामध्ये 56,000 रूपयांची भर घातली व ती सर्व रक्कम 7.5% दराने चक्रवाढ व्याजाने बँकेत गुंतवली. तर 3 वर्षांनंतर एकूण किती रक्कम परत मिळेल?

प्र. 4 खालील उपप्रश्न सोडवा. (कोणतेही दोन) **(8)**

1) सोडवा.

$$\frac{\sqrt{x+7}+\sqrt{x-2}}{\sqrt{x+7}-\sqrt{x-2}} = \frac{5}{1}$$

(3)

2) खालील दिलेल्या माहितीच्या आधारे शतमान स्तंभालेख काढा.


वर्ष	तांदळाचे उत्पादन (क्विंटल)	मकाचे उत्पादन (क्विंटल)
2023	20	20
2024	30	20
2025	30	10

3) 3 खुर्च्या व 2 टेबलांची किंमत 4500 रूपये आहे. 5 खुर्च्या व 3 टेबलांची किंमत 7000 रूपये आहे तर 2 खुर्च्या व 2 टेबलांची किंमत काढा.

(3)

प्र. 5 खालील उपप्रश्न सोडवा. (फक्त - 1)

1) पुढील कृतीसाठी सूचना दिलेल्या आहेत. त्यावरून एकसामयिक समीकरणे तयार करा व सोडवा.



2) **निखिलने आपल्या मासिक उत्पन्नाच्या 5% भाग मुलांच्या शिक्षणासाठी खर्च केला 14% भाग शेअर्समध्ये गुंतवला व 3% भाग बँकेत ठेवला आणि 40% भाग दैनंदिन खर्चासाठी वापरला. गुंतवणूक व खर्च जाऊन त्याच्याकडे ₹ 19,000 उरले, तर त्याचे मासिक उत्पन्न काढा.**

* * * *

टिप : 1 आलेख पेपर आवश्यक

https://www.pyqonline.com
Whatsapp @ 9300930012
Send your old paper & get 10₹ to 40₹
अपने पुराने पेपर्स भेजे और 10 रुपये से 40 रुपये तक पायें,
Paytm or Google Pay से